सयाजी ज्ञानमाला : २

# महाराजा सयाजीराव कृतीशील सत्यशोधक

## दिनेश पाटील



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

सयाजी ज्ञानमाला : २

# महाराजा सयाजीराव कृतिशील सत्यशोधक

दिनेश पाटील

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
कृतीशील सत्यशोधक
इतिहास
दिनेश पाटील
●
प्रकाशन क्रमांक - २२
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

सयाजी ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : दिनेश पाटील
फ्लॉट ११४, सत्यवती कॉलनी,
जाखले-वारणानगर
ता. पन्हाळा जि. कोल्हापूर ४१६११३
९६२३८५८१०४
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : २९ रुपये

---

● मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
● या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
● **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
● **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# सयाजी ज्ञानमाला
# निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी सयाजी ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही सयाजी ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**सयाजी ज्ञान माला**
**ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# कृतिशील सत्यशोधक

"विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली,
नीतिविना गती गेली,  गतीविना वित्त गेले,
वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले."

महात्मा फुल्यांच्या या ओळी गेल्या ६० वर्षातील महाराष्ट्रातील पुरोगामी प्रबोधन परंपरेचा 'मूलमंत्र' म्हणून लाखो वेळा उच्चारल्या गेल्या असतील. परंतु आपल्या प्रबोधन परंपरेतील 'जयघोष' संस्कृतीत या ओळी सुभाषिताच्या दर्जापलीकडे गेल्या नाहीत. 'अज्ञान हेच गुलामीचे प्रमुख कारण आहे' याची उथळ चर्चा महाराष्ट्रात वारेमाप झाली. परंतु फुल्यांच्या या ओळींचा मथितार्थ सर्वार्थाने 'कृतिशील' करणारा एकमेव प्रशासक म्हणून सयाजीरावांचे असणारे योगदान मात्र आम्ही चर्चेच्या परिघाबाहेर ठेवले.

'फुले असे म्हणाले' आणि 'फुले तसे म्हणाले' याचीच कीर्तने आम्ही करत राहिलो. फुल्यांचे अज्ञानाला भिडण्याचे

तत्त्वज्ञान आम्ही अक्षरओळख आणि नकारात्मक धर्मटीका या चौकटीत बंदिस्त केले. याउलट फुले ज्यांना गुरुस्थानी मानत होते ते फुल्यांचे सृजनशील अनुयायी सयाजीराव मात्र फुल्यांना अपेक्षित असणारा 'अज्ञान निर्मूलनाचा कृतिकार्यक्रम' मानवी जीवनाचे एकही अंग न सोडता शांतपणे, कोणताही डांगोरा न पिटता, स्टंटबाजी न करता आपल्या बडोदा संस्थानाबरोबर महाराष्ट्रभर राबवत होते.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे फुल्यांचे अनुयायी असणे म्हणजे ब्राह्मणांना शिव्या देणे आणि त्यांचा द्वेष करणे या संकुचित सुत्रापलीकडे जाऊन, प्रसंगी फुल्यांपेक्षाही परखड भाषेत परंतु ब्राह्मणद्वेष विरहित दृष्टिकोनातून ब्राह्मणांचा समाचार घेणाऱ्या सयाजीरावांना महाराष्ट्र कृतघ्नपणे विसरला यातच आपल्या पुरोगामी चळवळीच्या 'जातीयकरणा'ची बीजे लपली आहेत. म्हणूनच कॉ. शरद पाटील ज्याला 'आत्मटीका' म्हणतात तो जीवघेणा मार्ग स्वीकारून आजच्या फुले जयंतीच्या निमित्ताने जोतीबा आणि सयाजीराव हा 'क्रांतीसेतू' समजून घेणे म्हणजे विषमतेचा प्रवाह ओलांडण्याचा 'नवा विचारपूल' तयार करणे होईल.

## हिम्मतबाज सयाजीराव

१८८३ मध्ये लिहिलेल्या 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथाच्या आरंभी फुल्यांनी वरील ओळी लिहिल्या होत्या. हा ग्रंथ प्रकाशित होण्याअगोदर दोन वर्षे १८८१ मध्ये सयाजीरावांना राज्याधिकार

प्राप्त झाले. या ग्रंथाच्या प्रकाशनाला सयाजीरावांनी आर्थिक मदत केली. विशेष म्हणजे या ग्रंथाचे पहिले दोन भाग नारायण मेघाजी लोखंडे संपादक असणाऱ्या दीनबंधू पत्रात क्रमशः प्रकाशित झाले होते. परंतु फुलेंनी या ग्रंथात भारतातील शेतकऱ्यांच्या दयनीय स्थितीसाठी भारतातील ब्राह्मणी व्यवस्थेबरोबरच ब्रिटिश सरकारवरही सडकून टीका केली होती. ब्रिटिश सरकारचा रोष आपल्यावर येऊ नये म्हणून सत्यशोधक असणाऱ्या लोखंडेंनी या ग्रंथाचे क्रमशः प्रकाशन बंद केले होते. या पार्श्वभूमीवर तर सयाजीरावांचे उघडपणे या ग्रंथाला अर्थसाहाय्य करणे किती हिमतीचे होते हे आपल्या लक्षात येईल. नुकताच राज्यकारभार हाती घेतलेल्या अवघ्या २० वर्षाच्या राजाने कारकीर्दीच्या आरंभीच इंग्रजांशी थेट भिडण्याची ही कृती अतिशय महत्त्वाची आहे. महात्मा फुल्यांच्या संदर्भाने गेली ६० वर्षे संशोधन-लेखनाचे पीक उदंड झाले असता फुल्यांच्या एकाही अभ्यासकाने सयाजीरावांच्या या कृतीचे मोल लक्षात घेतले नाही.

१९ ऑक्टोबर १८८२ रोजी महात्मा फुले हंटर कमिशनसमोर बहुजनांच्या शिक्षणासंदर्भात मागणी करत होते. त्याच वर्षी सयाजीराव अस्पृश्य आणि आदिवासींसाठी मोफत शिक्षण, शैक्षणिक साहित्य आणि वसतिगृहाच्या सोयीसह उपलब्ध करून देऊन फुल्यांच्या मागणीबरोबर कृतीचे पाऊल टाकत होते. इतकेच नव्हे तर स्त्रीशिक्षिका तयार करण्याच्या उद्देशाने

स्त्रियांचे शिक्षणशास्त्र महाविद्यालयही याच वर्षी महाराज जेव्हा सुरू करतात तेव्हा शूद्रातिशूद्र आणि स्त्रिया यांच्या उन्नतीचे महाद्वार उघडतात. इतकी कृतिशीलता सयाजीरावांच्या नंतर एकाही फुले अनुयायाला प्रत्यक्षात आणता आली नाही. पुढे १९०६ मध्ये भारतात सर्वप्रथम बडोदा संस्थानात महाराज जेव्हा सक्तीच्या आणि मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा करतात तेव्हा तर ते फुल्यांपेक्षाही मोठे क्रांतिकारक ठरतात. कारण या कायद्यात १० वर्षापर्यंतची मुले आणि ८ वर्षापर्यंतच्या मुलींना शाळेत पाठवले नाही तर पालकांना ते दिवसाला एक रुपया दंडाची तरतूद करतात.

या तरतुदीचा थेट संबंध १८८२ च्या फुल्यांनी हंटर कमिशनसमोर केलेल्या मागणीशी आहे. कारण ही मागणी करत असताना फुल्यांनी पालकांना दंड करून पालकांकडून जमा होणारा दंड बहुजनांच्या शिक्षणावर खर्च करावा अशीही मागणी केली होती. १९०६ च्या १ रुपयाचे आजचे मूल्य २५०० रु. भरते हे वाचून आज आपण यावर विश्वास ठेवणार नाही. परंतु यातून शिक्षण हेच परिवर्तनाचे साधन आहे ही बाब महाराज किती गंभीरपणे घेत होते याचा साक्षात्कार होतो. फुल्यांची मागणी आणि सयाजीरावांची कृती यांची जेव्हा आपण तुलना करतो तेव्हा फुल्यांना गुरू मानणाऱ्या इतर सर्व समाजक्रांतिकारकांच्या सयाजीराव किती पुढे होते याचा पुरावा मिळतो.

फुलेंनी ‘शेतकऱ्यांचा असूड’ मध्ये मांडलेली भूमिका आणि व्यक्त केलेल्या अपेक्षा आपण जेव्हा सयाजीरावांच्या शेतीविषयक कार्याशी जोडून समजून घेतो तेव्हा सयाजीरावांच्या कृतिशीलतेचे मोठेपण लक्षात येते. सयाजीरावांनी १८९७ मध्ये स्वतंत्र शेती खाते सुरू केले. शेतीसाठी पाणी, अवजारांबरोबरच कृषिविषयक प्रगत ज्ञान शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले. 'कृषीकर्मविद्या' हा ६०० पानांचा ग्रंथ १८९८ मध्ये प्रकाशित केला. बँक ऑफ बडोदा आणि विविध सहकारी पतपेढ्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून दिले. संस्थानाच्या वतीने १२,००० विहिरी खोदल्या. संस्थान आणि शेतकऱ्यांच्या संयुक्त मालकीचा गणदेवी हा आशियातील पहिला सहकारी साखर कारखाना १८८५ ला सुरू करून भारतात कृषी-औद्योगिक क्रांतीचा पाया घालतात. शेती विकासासाठी ४२ प्रकारच्या सहकारी संस्थांमार्फत ‘कृषी सहकारा’चा मानदंडही निर्माण करतात. हे सर्व प्रयत्न म्हणजे फुल्यांच्या शेतकरी कल्याण कार्यक्रमाचाच परिपूर्ण विकास आहे.

फुल्यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून पाहिलेल्या स्वप्नांचा सयाजीरावांनी फुलेंच्या कल्पनेपलीकडे विस्तार केल्याचे शेकडो पुरावे मिळतात. धार्मिक विधी, संस्कृत ग्रंथांचे मराठी अनुवाद, अस्पृश्यांसह सर्व जातीच्या लोकांना मोफत संस्कृत शिक्षण, पाश्चात्य संस्कृतीचा परिचय करून देणारे ग्रंथ प्रकाशन, ग्रंथालय चळवळ, सक्तीच्या आणि मोफत

शिक्षणाबरोबरच लोकांमध्ये अधिकार आणि कर्तव्यांबाबत साक्षरता निर्माण करणे, ग्रंथ व वर्तमानपत्रांचे प्रकाशन आणि व्याख्याने या माध्यमातून जनजागृतीचे बहुमूल्य कार्य महाराजांनी सातत्याने केले. हे कार्यसुद्धा फुल्यांच्या अपेक्षित 'प्रबोधना'चा सकारात्मक विस्तारच आहे.

## सत्यशोधकांशी जिव्हाळा

१८८३ ते १८९० या वर्षात फुल्यांचे बडोद्याला सातत्याने जाणे-येणे होते. यामध्ये एकदा ते तीन महिने बडोद्यात राहिले होते. १८८४ च्या दरम्यान धामणस्करांकरवी महाराजांनी फुल्यांना बडोद्याला बोलावले. समाजसुधारणेवर त्यांची २-३ व्याख्याने ठेवली. हेच धामणस्कर पुढे १९०१ मध्ये बडोदा संस्थानचे दिवाण झाले. नामांकित कंत्राटदार असणाऱ्या स्वामी रामय्या व्यंकय्या अय्यावारू या प्रमुख सत्यशोधक नेत्याला सयाजीरावांनी आपल्या लक्ष्मीविलास राजवाड्याच्या बांधकामाचे काम दिले. दामोदर सावळाराम यंदे आणि रामजी संतुजी आवटे यांनी ११ ऑक्टोबर १८८५ रोजी 'बडोदा वत्सल' हे सत्यशोधकी वर्तमानपत्र बडोद्यात सुरू केले. तर ३१ नोव्हेंबर १८९३ रोजी दामोदर सावळाराम यंदे यांनी 'श्री सयाजीविजय' हे नवे साप्ताहिक स्वतंत्रपणे सुरू केले.

१८८५ मध्ये पुणे जिल्ह्यातील जुन्नर भागात शेटजी-भटजींच्या विरुद्ध सत्यशोधकांच्या ज्या सभा होत त्यावेळी सत्यशोधक समाजातर्फे सयाजीरावांचा सत्कार झाला होता अशी आठवण

सत्यशोधक नारो बाबाजी महागट यांनी नोंदवली आहे. यावेळीच सत्यशोधकांच्या काही शाळांमध्ये महाराज उपस्थित राहिले होते. सत्यशोधक समाजाच्यावतीने सुरु करण्यात आलेल्या शाळेला महाराजांनी बरीच वर्षे दरमहा १०० रुपये देणगी दिली.

रामजी संतूजी आवटे आणि धामणस्करांनी मिळून १८९६ च्या दरम्यान बडोद्यात माधवराव पवार यांच्या घरी मराठा जातीचे पुजारी तयार करण्याचा वर्ग सुरू केला. वासुदेव लिंगोजी बिर्जे हे सत्यशोधक सयाजीरावांच्या पॅलेस लायब्ररीचे ग्रंथपाल होते. त्यांचे 'क्षत्रिय व त्यांचे अस्तित्व' हे पुस्तक सयाजीरावांच्या आश्रयानेच प्रकाशित झाले. १७ फेब्रुवारी १९३० रोजी महाराजांनी लक्ष्मीविलास पॅलेसमध्ये सत्यशोधक समाजाच्या काही कार्यकर्त्यांची व्याख्याने जनतेसाठी मुद्दाम ठेवली होती. या व्याख्यानांना महाराज स्वत: हजर होते. यावेळी नारो बाबाजी महागट यांना मदत म्हणून २०० रु. रोख दिले होते.

मॅक्स मुल्लरने भाषांतरित केलेल्या 'सेक्रेड बुक्स ऑफ दी ईस्ट' या मालेत प्रकाशित केलेल्या बारापैकी सात उपनिषदांचा मराठी अनुवाद करण्याचे काम सयाजीरावांनी सत्यशोधक विचारधारेच्या केळूसकरांवर सोपवले. हे भाषांतर करत असताना केळूसकरांनी मॅक्स मुल्लरऐवजी मूळ संस्कृत ग्रंथांवरून ते केले. संस्कृत ग्रंथांवरून थेट मराठीत असे भाषांतर करणारे केळूसकर हे पहिले ब्राह्मणेतर ठरतात. कोल्हापूर संस्थानचे दिवाण भास्करराव जाधव सयाजीरावांच्या आश्रयाने सुरू असलेल्या गंगारामभाऊ

म्हस्के यांच्या डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनच्या शिष्यवृत्तीवर शिकले. त्यांना सयाजीरावांनी बडोद्यात नोकरीस येण्याची सूचना केली होती. सत्यशोधक कर्मवीर भाऊराव पाटील यांनासुद्धा रयत शिक्षण संस्थेची प्रेरणा सयाजीरावांकडून मिळाली होती हे त्यांनी स्वतःच नोंदवून ठेवले आहे. सत्यशोधक जागृतीकार पाळेकर बडोद्यात 'जागृती' वर्तमानपत्र यशस्वीपणे चालवत होते.

## पुरोगामी चळवळीचा तारणहार : सयाजीराव

वरील सर्व नामावली विचारात घेता फुल्यांच्या सत्यशोधक संस्कारात घडलेली ही सर्व महत्त्वाची मंडळी सयाजीरावांकडून 'उपकृत' झालेली होती. सयाजीरावांनी सर्व विचारधारांना राजाश्रय दिला असला तरी सत्यशोधक आणि बौद्ध विचाराचे लोक हे सयाजीरावांसाठी सर्वात जवळचे होते याचे स्पष्ट पुरावे मिळतात. सयाजीरावांच्या एकूण चिंतनात तुलनात्मक विचारपद्धतीला महत्त्वाचे स्थान होते. फुल्यांचा टोकाचा नकारात्मक विद्रोह मूलभूत सकारात्मक धर्म साक्षरतेत रुपांतरित करण्याचे अत्यंत क्रांतिकारक काम सयाजीरावांनी तुलनात्मक धर्मचिंतनाच्या आपल्या व्यासंगातून केले होते. यावर वेळीच प्रकाश पडला असता तर सत्यशोधक चळवळीचे पुढे फुल्यांनंतर ब्राह्मणेतर चळवळीत रुपांतर होत असताना झालेले 'जातीयकरण' टाळता आले असते. परिणामी आज पुरोगामी चळवळीचे झालेले 'विषारीकरण' टळले असते. पुरोगामी चळवळ 'संवादी' आणि

'सकारात्मक' झाली असती. ती आपल्या उद्दिष्टाच्या अधिक जवळ गेली असती.

१८८२ ला ज्याप्रमाणे फुल्यांच्या मागणीला पुढे नेणारे शैक्षणिक काम सयाजीरावांनी सुरू केले. १८८४ ला फुल्यांनी मुंबई सरकारकडे बालविवाह प्रतिबंधक कायदा करण्याची मागणी केली होती. त्याचप्रमाणे बालविवाह करणाऱ्या दोन्ही पक्षातील पालकांकडून दंड वसूल करावा आणि हा दंड बहुजनांच्या शिक्षणासाठी खर्च करावा हा मुद्दाही या मागणीत होता. सयाजीरावांनी फुल्यांच्या मागणीनंतर ४ वर्षांनी १४ जुलै १८८६ ला सर इलियट यांना लिहिलेल्या पत्रात बालविवाह प्रतिबंधासाठीच्या उपाययोजनांचा निश्चय केल्याचे लिहिले आहे. पुढे १९०४ मध्ये सयाजीरावांनी बडोद्यात बालविवाह प्रतिबंधक कायदा लागू केला. हा कायदा फुल्यांच्या मागणीला सुसंगत होता. पण येथेही महाराजांनी फुल्यांच्या पुढे एक पाऊल टाकले होते. फुल्यांनी बालविवाह करणाऱ्या वधू आणि वर पक्षाला दंड करावा अशी मागणी केली होती.

पण महाराजांनी मात्र वधू आणि वर पक्षाबरोबर लग्न लावणाऱ्या भटजीलासुद्धा दंड आणि शिक्षेच्या तरतुदीत आणले होते. ५० रु. दंड किंवा १ महिन्याचा तुरुंगवास असे या शिक्षेचे स्वरूप होते. पुढे १९३७ मध्ये दंडाची रक्कम ५० रु. वरून १०० रु. झाली. ही दंडाची रक्कम आजच्या रुपयाच्या मूल्यात १ लाख ५७ हजार रु.हून अधिक भरते. फुले हे भारतातील पुरोहितशाहीचे

सर्वात ‘कडवे’ विरोधक होते. असे असूनसुद्धा फुल्यांची झेप वधू-वरांच्या माता-पित्यांपलीकडे गेली नाही. सयाजीराव मात्र लग्न लावणाऱ्या भटजीला जेव्हा कायद्याच्या चौकटीत दंड देण्याची तरतूद करतात तेव्हा ते शिवराय आणि शंभूराजे यांचा पुरोहितशाहीने केलेल्या छळाचा एकप्रकारे ‘सूड’ उगवताना दिसतात. भारतीय धर्मक्रांतीच्या महाचर्चेत सयाजीराव या ‘क्रांतीसूर्या’ला बेदखल करण्याच्या पार्श्वभूमीवर जेव्हा आपण हे नवे संशोधन अभ्यासतो तेव्हा आपली प्रबोधन परंपरा किती ‘निसत्व’ झाली आहे याचा साक्षात्कार होतो. सयाजीचिंतन ही आपली तातडीची गरज का आहे हे समजण्यासाठी एवढी चर्चा पुरेशी आहे.

## महात्मा फुल्यांच्या पुढची झेप

पुरोहितशाहीच्या विळख्यात जगातील सर्वच मानवी समाज ‘गुदमरत’ जगत आले आहेत. फुल्यांनी म्हणूनच या पुरोहितशाहीवर घणाघात केले. या पुरोहितशाहीला पर्याय देण्याचा ‘प्रतीकात्मक’ प्रयत्न केला. या प्रयत्नाचाच भाग म्हणून महात्मा फुलेंनी सत्यशोधक समाजाच्या सत्यशोधक विधिंसंबंधी मंगल अष्टकांसह सर्व पूजा विधींची छोटी पुस्तिका १८८७ मध्ये प्रकाशित केली होती. फुल्यांचे हे काम नेमके याच वर्षी १८८७ मध्ये ‘नीतीविवाह चंद्रिका’ हा ग्रंथ मराठीत प्रकाशित करून सयाजीराव पुढे व्यापक करताना दिसतात. ‘हे असे का घडले’ याचा शोध घेण्याचे आमच्या ‘महान’ संशोधन

परंपरेने टाळले. यातूनच प्रबोधन परंपरेचे आजचे 'अनर्थ' घडले. या मालेत पुढे १९०३ मध्ये 'वधूपरीक्षा', १९०४ मध्ये 'लग्नविधी व सोहळे' , १९१३ मध्ये 'विवाह विधीसार', १९१६ मध्ये 'उपनयन विधीसार' पुढे 'श्राद्ध-विधीसार' , 'अंत्येष्टीविधिसार' , 'दत्तकचंद्रिका', 'दानचंद्रिका' इ. ग्रंथ प्रकाशित करून फुल्यांनी सुरू केलेल्या धर्मचिकित्सेला सयाजीरावांनी सकारात्मक धर्म साक्षरता अभियानात रुपांतरित केले.

१८९६ च्या वेदोक्तानंतर सयाजीरावांनी सर्व वेदोक्त विधींच्या संदर्भातील १६ संस्कारांच्या विधींचे मराठी भाषांतर करून छापण्याचे काम रियासतकार सरदेसाईंकडून करून घेतले होते. इतकेच नाही तर १९०५ च्या हिंदू विवाह कायद्यात १९२८ साली सुधारणा करून लग्नविषयक सर्व वैदिक मंत्रांचे मराठी, गुजराथी व हिंदी या भाषांमध्ये भाषांतर करून ते सरकारमार्फत प्रसिद्ध करण्यात यावे व ते भाषांतर वधू-वरांच्या मातृभाषेत लग्न लावणाऱ्या पुरोहिताने वाचून समजावून सांगावे व तसे न केल्यास त्याला ५०रु. दंड करण्याची तरतूद केली. ही दंडाची रक्कम आजच्या रुपयाच्या मूल्यात १ लाख ३० हजार रु.हून अधिक भरते.

## आंबेडकरांकडून अनुकरण

१९१५ मध्ये बडोद्यात लागू झालेला हिंदू पुरोहित कायदा फक्त भारतातीलच नव्हे तर जगातील अशा प्रकारचा पहिला आणि आजअखेरचा एकमेव कायदा आहे. या कायद्यातील कलमे, या

कायद्याचा उल्लेख न करता का असेना, आपल्या १९३६ च्या जगप्रसिद्ध 'Annihilation of Caste' या न झालेल्या प्रकाशित भाषणात त्यांचा स्वत:चा धर्मसुधारणेचा कार्यक्रम म्हणून देत असताना जशीच्या तशी वापरण्याचा मोह फुल्यांचे महत्तम शिष्य बाबासाहेबांनासुद्धा आवरता आला नाही. यातच या कायद्याचे वैश्विक 'अनन्यत्व' सिद्ध होते.

१९११ मध्ये महाराजांनी पुजारी आणि पुराणिक यांच्यासाठी परीक्षा घेण्याचा आदेश दिला. नोव्हेंबर १९१२ ला या कायद्याच्या अनुषंगाने पहिली पुरोहित परीक्षा घेण्यात आली. २२ मे १९१३ ला हिंदू पुरोहित बिल प्रसिद्ध झाले. १९१३-१९१४ मध्ये धारा सभेच्या दुसऱ्या सत्रात या बिलावर चर्चा करण्यात आली आणि यावर लोकांचे मत जाणून घेण्यासाठी वेळ वाढवून देण्यात आला. अशाप्रकारे लोकांच्या प्रतिक्रिया विचारात घेऊन या कायद्यात दोन वेळा दुरुस्त्या केल्या आणि ३० डिसेंबर १९१५ साली हिंदू पुरोहित कायदा बडोदा जिल्ह्यात लागू केला. या कायद्याचा मुख्य उद्देश धार्मिक विधी योग्य पद्धतीने व्हाव्यात आणि त्यांचा खरा अर्थ यजमानांना कळून यजमानांचा पूजेमागील आध्यात्मिक हेतू साध्य व्हावा हा होता.

पुढे १४ सप्टेंबर १९३४ ला हा कायदा संपूर्ण संस्थानात लागू करण्यात आला. या कायद्यानुसार हिंदू पुरोहित परीक्षा, याज्ञिक विषयातील किंवा श्रावण मास दक्षिणा परीक्षा यापैकी कोणत्याही परीक्षेत पास झाल्यास किंवा संस्थानाकडून विशेष

बाब म्हणून मान्यता दिलेल्या व्यक्तीस संस्थानाकडून परवाना मिळाल्यावरच पौरोहित्याचा अधिकार प्राप्त होत होता. या निकषात न बसणारा पुरोहित धार्मिक विधी करत असल्यास त्याला २५ रु. पर्यंत दंडाची तरतूद होती. पण पुरोहित उपलब्ध नसल्यास सवलत दिली जात होती. तसेच पौरोहित्याचा हक्क प्राप्त झालेल्या पुरोहितास सहा वर्षातून एकदा पुरोहित परीक्षा पास होणे बंधनकारक होते. ही परीक्षा पास होणाऱ्या सर्व हिंदूंना मग त्यांची जात कोणतीही असो त्याला ही परीक्षा पास झाल्यावर पौरोहित्य करता येत होते. ही बाब २००० वर्षांच्या हिंदू धर्म-संस्कृतीच्या इतिहासातील एक मोठी क्रांती होती. परंतु हिंदू धर्म अभ्यासाच्या इतिहासात या कायद्यावर एक शब्दही लिहिला गेला नाही. नंतर ही मर्यादा ३ वर्षांवर व शेवटी दरवर्षी परीक्षा पास होऊन परवाना घेणे बंधनकारक करण्यात आले. पारंपरिक पुरोहितांना  हा कायदा लागू झाल्यानंतर ६ वर्षाच्या आत ही परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक होते.

या कायद्याने स्वातंत्र्यपूर्व काळात पूजा, धार्मिक कार्य करणाऱ्या पुरोहितांसाठी परवाना पद्धत सुरू केली. पुरोहितांनी पूजेवेळी केल्या जाणाऱ्या मंत्रपठणातील मंत्राचा अर्थ यजमानांना समजून सांगणे बंधनकारक केले. पुरोहित व्यवसाय वंश परंपरेऐवजी गुणवत्तेवर असावा म्हणून परीक्षा पद्धतीद्वारे ज्ञान तपासण्याची व्यवस्था करून ब्राह्मण जातीची पुरोहित मक्तेदारी नष्ट केली आणि ब्राह्मणेतर सर्व हिंदू जातींना पुरोहिताची संधी

देऊन जातीजातीमधील उच्चनीचपणा कमी केला. जगभर धर्म आणि पुरोहित वर्गाचे वर्चस्व असताना पुरोहितांकडून होणाऱ्या शोषणातून लोकांची मुक्तता करणारा पुरोहित कायदा हा भारतातीलच नव्हे तर जगातील अशा प्रकारचा पहिला कायदा होता जो आजच्या क्रांतिकारक बदलाच्या कालखंडातही भारताला करणे शक्य नाही.

महात्मा फुल्यांच्या धर्मचिकित्सेची आणि सांस्कृतिक बंडाची तुलना सयाजीरावांच्या फक्त या एका कायद्याशी केली तरी सयाजीरावांचे फुले विचाराच्या विकासाला असणारे योगदान स्पष्ट होते. फुले आणि सयाजीराव यांनी केलेल्या पुरोहितशाहीच्या 'शवविच्छेदना'च्या पार्श्वभूमीवर १९०७ मध्ये भोर संस्थानात केलेले भाषण महत्त्वाचे आहे. हे भाषण ऐकायला जर फुले हजर असते तर तेसुद्धा सयाजीरावांपुढे नतमस्तक झाले असते एवढी रोखठोक भूमिका या भाषणात सयाजीराव घेताना दिसतात. सयाजीरावांनी ८ सप्टेंबर १९०७ मध्ये भोर संस्थानाला भेट दिली.

त्यावेळी केलेल्या भाषणात सयाजीराव म्हणतात, "ब्राम्हण विद्वान आहेत; पण देशाची सुधारणा होणे असेल तर ब्राह्मणांच्या विद्वत्तेबरोबर त्यांचे विचारही सुधारले पाहिजेत. ब्राम्हण-भिक्षुकवर्ग यांचे कर्तव्य किती महत्त्वाचे आहे याचा विचार करा. परंतु ते आपल्यावरील जबाबदारी ओळखीत नाहीत, ही गोष्ट फार वाईट आहे. मी खरे आहे ते बोलतो याचा कोणी

राग मानू नये. बैलावर साखरेची अगर मातीची गोणी घातली तरी त्याला सारखीच, त्याप्रमाणे भिक्षुकवर्गाची स्थिती झाली आहे. भिक्षुकांचे नुसते पोपटपंचीचें ज्ञान बिलकूल उपयोगाचे नाही. असा श्रेष्ठ वर्ग जर अडाणी राहिला तर देशाचे कोणत्याहि प्रकारे कल्याण होणार नाही. सुशिक्षित शास्त्री संस्कृत पाठ म्हणू शकतात; परंतु मातृभाषेत आपले विचार त्यास सांगता येत नाहींत. धर्माचा उपदेश देणारे लोक चांगले समजदार असले पाहिजेत. जुने रिवाज मोडणे शक्य व कायदेशीर असेल तर राजाने धैर्याने त्यात फेरफार केला पाहिजे.” सयाजीरावांचे हे भाषण वाचत असताना तुकाराम महाराजांच्या ‘वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा | येरांनी वाहावा भार माथा ||’ या ओळींची आठवण होते.

## फुले दांपत्याचा आधारवड

पक्षाघाताच्या पहिल्या आजारपणात उपचारासाठी सयाजीरावांनी फुल्यांना आर्थिक मदत केली. या आजारात उजवा हात पक्षाघाताने निकामी झाल्यामुळे डाव्या हाताने फुल्यांनी ‘सार्वजनिक सत्यधर्म’ हा महत्त्वाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाच्या शेवटी फुल्यांनी या आजारपणातून वाचण्यासाठी ज्यांनी मदत केली त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारा एक अखंड लिहिला आहे. त्या अखंडाच्या पहिल्या दोन ओळी महत्त्वाच्या आहेत. या अखंडाची सुरुवातच सयाजीरावांच्या उल्लेखाने झाली आहे. त्या ओळी पुढीलप्रमाणे –

गायक्वाडी आश्रय, घोल्याची नजर ॥ होती अनिवार ॥ फी न घेतां ॥१॥ गा.॥ धृ.॥

दुष्ट रोगांतून फुल्या वांचविला ॥ आनंदी पत्नीला ॥ केली ज्याच्या ॥२॥

महात्मा फुल्यांची सर्वांत महत्त्वाची लेखनकृती असणारा 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकाच्या शेवटी सयाजीरावांबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना महाराजांचा उल्लेख फुले 'सद्सदविचारसंपन्न' असा करतात. यावरून फुल्यांच्या जीवनात सयाजीरावांचे स्थान काय होते हे लक्षात येते.

१८९० मध्ये फुल्यांच्या मृत्यूनंतर सावित्रीबाई आणि यशवंत यांना अत्यंत हलाखीत दिवस काढावे लागत होते. मामा परमानंदांच्या विनंतीवरून महाराजांनी सावित्रीबाईंच्या मदतीसाठी धामणस्करांच्या हस्ते एक हजार रुपयांचा चेक पाठवून दिला असे १०-२-१८९२ च्या धामणस्करांनी मामांना लिहिलेल्या पत्रावरून कळते. हा चेक मामांचे स्नेही तुकाराम तात्या भागीदार असणाऱ्या एस. नारायण कंपनीत ठेवून त्या रकमेच्या व्याजातून दर तिमाहीस सावित्रीबाईंना ५० रु. मदत मिळण्याची व्यवस्था झाली. या ठेवीची पावती सावित्रीबाईंकडे ठेवण्याचा हुकूम महाराजांनी धामणस्करांना दिल्याप्रमाणे रजिस्टर पत्राने ती सावित्रीबाईंकडे पाठवण्यात आली.

## फुल्यांचे पहिले समर्थक

फुल्यांच्या मृत्यूनंतर बडोद्यातील 'बडोदावत्सल' या सत्यशोधकी विचाराच्या साप्ताहिकाने ७ डिसेंबर १८९० मध्ये लिहिलेल्या मृत्युलेखात फुल्यांचे समग्र वाङ्मय प्रकाशित करण्याची मागणी सर्वप्रथम केली होती. पुढे ७९ वर्षांनी १९६९ मध्ये महाराष्ट्र शासनाने फुल्यांचे समग्र वाड्.मय प्रकाशित केले. १८९२ मध्ये 'बडोदा वत्सल'ने सावित्रीबाईंचा भाषणसंग्रह प्रकाशित केला. फुल्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे स्मारक झाल्यास त्याला आर्थिक मदत करण्याची सयाजीरावांनी तयारी दर्शवली होती. परंतु तसे प्रयत्न न झाल्याने तो विषय तेथेच थांबला. पुढे 'सत्यप्रकाश' हे सत्यशोधक समाजाचे मुखपत्र प्रकाशित करण्याची योजना पुढे आल्यानंतर त्याला मदत करण्याची भूमिका सयाजीरावांनी घेतली होती.

ज्याप्रमाणे निरक्षर सावित्रीबाईंना महात्मा फुल्यांनी शिक्षण देऊन शिक्षिका म्हणून तयार केले त्याचप्रमाणे सयाजीरावांनी त्यांच्या पत्नी महाराणी चिमणाबाई ज्या विवाहापर्यंत निरक्षर होत्या त्यांना शिक्षण दिले. पुढे चिमणाबाईंनी १९११ मध्ये 'The Position of Women In Indian Life' हा संशोधनात्मक ग्रंथ इंग्रजीत लिहिला जो लंडनमधून प्रकाशित झाला. विशेष म्हणजे सर्व खंडातील स्त्रियांच्या दर्जाचा प्रत्यक्ष फिरून व १०० संदर्भ ग्रंथांचा आधार घेऊन लिहिला गेलेला तो जगातील आजअखेरचा एकमेव ग्रंथ आहे. फुले सयाजीरावांना आपला

आदर्श मानत होते तर सयाजीराव आपल्या सामाजिक आणि धार्मिक सुधारणांच्या धोरणांमध्ये कौशल्याने आणि कोणताही गाजावाजा न करता 'फुलेविचार' विकसित करून पेरत होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे फुले विचाराबाबतची सायाजीरावांची कृतिशीलता अतिशय लक्षणीय आहे.

जोतीबा फुले यांचा उल्लेख महाराज नेहमी महात्मा असा करत. १८८८ मध्ये महाराजांनी केलेल्या सूचनेनुसार मुंबईमधील सत्यशोधक कार्यकर्त्यांनी जोतीरावांना 'महात्मा' ही पदवी अर्पण केली. सयाजीरावांबद्दल महात्मा फुल्यांना असणारा आदर फुल्यांनी एक अखंड लिहून व्यक्त केला. हा अखंड त्यावेळी दीनबंधू वर्तमानपत्रात प्रकाशित झाला होता. फुल्यांनी पत्राद्वारे मागणी करून सयाजीरावांचा फोटो हवा असल्याचे सांगितले होते. त्यानुसार महाराजांनी आपला राजवेषातील फोटो फुल्यांना पाठवला. परंतु त्याऐवजी साध्या वेशातील फोटो मागवून तो फुल्यांनी त्यांच्या बैठकीच्या खोलीत लावला होता. महात्मा फुल्यांनी सयाजीरावांचा फोटो आपल्या बैठकीच्या खोलीत लावणे यातच पुरोगामी महाराष्ट्राचा 'खरा' इतिहास लपला आहे. महाराष्ट्र जेवढ्या लवकर हे वास्तव स्वीकारेल तेवढे ते महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेला जिवंत ठेवण्यासाठी पोषक ठरेल.

## सयाजीरावांची अनिर्वायता

हा सर्व इतिहास जाणून घेताना होणाऱ्या आनंदापेक्षा होणाऱ्या वेदनाच 'भयंकर' आहेत. कारण गेली ६० वर्षे फुले नावाच्या 'खळ्या'भोवती 'रिंगण' घालण्यातच आम्ही धन्यता मानली. फुले विचाराचा गाभा असणाऱ्या या 'मूळ' खळ्यापर्यंत मात्र आम्ही पोहोचलोच नाही. परिणामी फुल्यांच्या विचाराला कृतिशील करणारे सयाजीराव आमच्यासाठी अज्ञात राहिले. फुले विचारातील कालबाह्य घटकांना पर्याय देऊ शकणारे सयाजीचिंतन 'जोडून' घेण्याची प्रक्रिया आम्ही स्वीकारली नाही. फुले विचार म्हणजे 'संकटकाळी बाहेर पडण्याचा रस्ता' अशी 'तात्पुरती सोय' म्हणून आम्ही स्वीकारला. फुले अभ्यासकांचा श्रेष्ठत्व गंडाने 'पछाडलेला' आत्मकेंद्री 'अहंकार' जोपासण्यासाठी फुले विचार प्रवाह संकुचित केला गेला. त्यातून त्याला साठलेपण आले. हे साठलेपणच त्याला निस्तेज आणि कालबाह्य करण्यास कारणीभूत झाले.

अपवाद फक्त कॉ. शरद पाटलांचा. कॉ. पाटलांनी मुख्यतः फुल्यांच्या तत्त्वचिंतनातील काळ आणि ज्ञानाच्या मर्यादा निर्भीडपणे पुढे आणून 'कालबाह्य फुले सोडण्याची आणि कालसुसंगत फुल्यांचा विकास करण्याची' भूमिका घेत फुल्यांच्या तत्त्वज्ञानाला जात आणि स्त्रीदास्यांतक भूमिकेतून 'अद्ययावत' केले. आपल्या उर्वरित 'पुरोगामी' अभ्यास परंपरेने मात्र वि.का. राजवाडेंचा आदर्श प्रमाणभूत मानला. वि.का.

राजवाडेंनी ब्राह्मण जातीला अडचणीचे ठरणारे कागद खाऊन टाकण्याची ‘किमया’ केली होती. अशी किमया करणारे ‘किमयागार’ ब्राह्मणी परंपरेपेक्षा पुरोगामी परंपरेतच जास्त आहेत हे सयाजीरावांचा इतिहास जसजसा पुढे येईल तसतसे अधिक ठळकपणे स्पष्ट होत जाईल.

कारण फुले-शाहू-आंबेडकरी संशोधनात महापुरुषांच्या मर्यादा झाकण्याचा आटापिटा करणारे संशोधक अधिक संख्येने सापडतात. आपल्या या पुरोगामी संशोधन परंपरेने बहुजनांचे जेवढे नुकसान केले तेवढे अडीच हजार वर्षांच्या ब्राह्मणी परंपरेनेही केले नाही. हा इतिहास कोणासाठी गौरवशाली आहे? या प्रश्नाचे उत्तर आता महाराष्ट्राला शोधावे लागेल. फुले जयंतीच्या निमित्ताने या चिंतनाचे ‘खडतर’ व्रत स्वीकारण्याची प्रेरणा सयाजीरावांच्या निमित्ताने नव्या पिढीला मिळाली तर पुरोगामी महापुरुषांच्या ‘स्वप्नपुर्ती’कडे टाकलेले ते एक ‘क्रांतिकारक’ पाऊल ठरेल.

●●●

## सयाजी ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूस्कर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सायाजीरावांचे आणि शोहुंचे - दिनेश पाटील
६४) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❐ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

● महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.

● सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाची महाराजा सयाजीरावांची वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

# सयाजी ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळयात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे ‘बौद्धिक नेतृत्व’च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे ‘महानायक’ सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

सयाजीरावांचा ‘उदोउदो’ करण्यासाठी सयाजी ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील ‘विसंवाद’ कमी करून ‘सुसंवाद’ वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही सयाजी ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास ‘जोडून’ वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
सयाजी ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com